मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

शनिवार दि. २१ डिसेंबर १९९६ रोजी झालेल्या मंडळाच्या ४१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

---

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाची ४१ वी बैठक शनिवार दिनांक- २१ डिसेंबर १९९६ रोजी सकाळी १०.३० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली.

या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] | ॲडव्होकेट श्री मधु चव्हाण, | सभापती. |
| २] | श्री अशोक लाल | मुख्य अधिकारी. |
| ३] | ,, वि. म. कोकणे. | उप सचिव/महाराष्ट्र शासन. |
| ४] | ,, अरविंद रेळे | सदस्य. |
| ५] | ,, विनोद खोपकर | ,, |
| ६] | ,, चंद्रकांत विश्वासराव | ,, |
| ७] | ,, अमोद उसपकर | ,, |
| ८] | ,, दगडू सकपाळ | ,, |
| ९] | ,, देवदास सावंत | ,, |
| १०] | ,, प्रकाश भुवड | ,, |
| ११] | ,, गणेश तिकोने | ,, |
| १२] | डॉ. दिनोद मेहता | ,, |
| १३] | श्री अभय सावरकरे | ,, |
| १४] | ,, दाजी मोडक | ,, |
| १५] | प्रमुख अभियंता, म. न. पा. यांचे प्रतिनिधी | निमंत्रक |
| १६] | उपकर निर्धारक व संकलक[शहरे] म. न. पा. | ,, |

बैठकीच्या सुरवातीस मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे व अधिकाऱ्यांचे स्वागत करून सर्व सन्मा. सदस्यांच्या संमतीने निवेदन सादर करताना सभागृहास माहिती दिली की, मागील बैठकांमध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठरावांपैकी रू. ७५०/- ची मर्यादा वाढवून ती रू. १०००/- करावी तसेच सदनिकेचे किमान क्षेत्रफळ १८० चौ. फू. ऐवजी २२५ चौ. फू. करावे व शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातून इमारतींची दुरूस्ती व पुनर्बांधणीची कामे चांगल्याप्रकारे करण्यासाठी काही सवलती देण्यात याव्यात तर काही इमारतींचा पुनर्विकास करण्यात यावा, याबाबत मा. मुख्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी

सर्वंकष विचार करण्याचे जाहीर करुन सुकथनकर समितीची स्थापना केली होती. सुकथनकर समितीने विचार करावयाचे मुद्दे असे होते की, सदनिकांचे क्षेत्रफळ वाढवून पावयाचे का? उत्पन्नाची कोणकोणती साधने वाढवावयाची, व्यापक प्रमाणात घरबांधणी करण्यासाठी काय करावयाचे, दुरुस्ती मंडळाचे कार्यक्षेत्र उपनगरांपर्यंत वाढवावयाचे का, घरमालक आणि भाडेकरु यांना त्यांच्याच घर बांधणीच्या कामासाठी सहभागी करुन घेता येईल का ? इत्यादी मुद्दयांवर विचार करुन निर्णय घेण्यासाठी सुकथनकर समितीला सहा महिन्यांचा अवधी देण्यात आला होता. परंतु ह्या सहा महिन्यांच्या कालावधीत वरील प्रश्न अतिशय किचकट असल्यामुळे निर्णय घेणे कठीण असल्यामुळे सुकथनकर समितीने एक महिन्याचा अवधी वाढवून मिळण्यासाठी शासनाकडे विनंती केली मध्यंतरीच्या काळात मंडळाच्या सदस्यांतर्फे सभापती म्हणून शासनास व सुकथनकर समितीस त्यांनी विनंती केली की, सुकथनकर समितीत मुदत वाढवून मिळेपर्यंत व समितीने निर्णय घेईपर्यंत मधल्या काळात मंडळाची जी जी कामे थांबलेली आहेत त्याकडे शासनाचे लक्ष वेधून सुकथनकर समितीने शासनाला काही अंतरिम स्वरुपात शिफारशी केलेल्या आहेत. त्या शिफारशींच्या आधारावर मा. मुख्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सभागृहात जे निवेदन केले आहे ते वर्तमानपत्रात प्रसिध्दही झाले आहे.

त्याबाबत अधिकृतपणे माहिती देताना मा. सभापती यांनी सांगितले की, १८० चौ. फू. क्षेत्रफळाच्या सदनिकां ऐवजी २२५ चौ. फू. कारपेट एरियाच्या सदनिका बांधण्याचे शासनाने मान्य केले आहे. त्याच बरोबर मालकी हक्काने लोकांना गाळे देण्यात येणार असून त्यासाठी कमीत कमी आर्थिक बोजा लोकांवर पडेल याची काळजी घेण्यात येणार आहे. परंतु इमारतीची देखभाल मात्र त्या इमारतीच्याच लोकांनी करावयाची आहे.

चर्चेच्या ओघाओघात त्यांनी अशी माहिती दिली की, यापुढे नवीन इमारतीत २२५ चौ. फू. क्षेत्रफळाच्या सदनिका बांधण्यात

५

येणार असल्यामुळे शासनाने मंडळास चटईक्षेत्र वाढवून देण्याचे धोरण अधिकृतपणे सभागृहात जाहीर केले आहे. तसेच ना हरकत प्रमाणपत्र देताना विकासकाला जो २.०० चटई क्षेत्रनिर्देशांक देतो त्यासाठी त्यांना वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक मिळणार आहे. ज्या इमारतीचे चटई क्षेत्रफळ ४ किंवा ४ हून अधिक वापरून आलेले आहे अशा इमारतींच्या बाबतीत काय करायचे याचा तपशीलवार अहवाल सुकथानकर समितीने देईल. त्यावेळी त्यांचे निकष जाहीर केले जातील. दुसरे असे की, मंडळातर्फे जेवढा रिपेअर सेस गोळा केला जातो तेवढेच अनुदान शासनाने मंडळास देणे बंधनकारक आहे. त्यातील एक गोष्ट तत्वत: मान्य न करता शासनाने असे जाहीर केले आहे की, मंडळ जेवढा रिपेअर सेस गोळा करेल तेवढे अनुदान शासन मंडळाला देईल.

सविस्तर चर्चेअंती मा. सदस्य श्री भालचंद्र ठाकूर यांनी १८० चौ. फू. ऐवजी किमान २२५ चौ. फू. क्षेत्रफळाची सदनिका देण्याचे धोरण शासनाने ठरविल्याबद्दल तसेच मा. शिवसेनाप्रमुखांच्या आशिर्वादाने मंडळाचे तीन सदस्य सर्वश्री दगडू सकपाळ, विनोद घोसाळकर व प्रकाश भूवड यांना युवक प्रमुख म्हणून पदे मिळाल्याबद्दल शासनाचे अभिनंदन करण्याचा ठराव मांडला व त्यास मा. सदस्य श्री दगडू सकपाळ व श्री दाजी सोडक यांनी अनुमोदन दिले.

ठराव क्रमांक : ४१/३३२.

शासनाने नवीन पुनर्रचित इमारतीमध्ये १८० चौ. फू. ऐवजी किमान २२५ चौ. फू. क्षेत्रफळाची सदनिका देण्याचे तसेच मंडळास वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक देण्याच्या घेतलेल्या निर्णयाबद्दल सर्वानुमते अभिनंदन करण्यात आले.

---

वरील चर्चेनंतर मा. सभापती यांनी सचिव श्री डी. एस. गद्रे यांना बैठकीचे कामकाज सुरू करण्याच्या सूचना दिल्या. सचिव यांनी उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे व अधिकाऱ्यांचे स्वागत करून करून बैठकीस सुरवात केली.

बाब क्रमांक : ४१/१.

विषय- मंडळाच्या दि. १५.११.९६ रोजी झालेल्या ४० व्या बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करणेबाबत.

मंडळाच्या दि. १५.११.९६ रोजी झालेल्या ४० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र. १ ते ११ वर सादर करण्यात आले आहेत. सदर कार्यवृत्तांतावर चर्चा होऊन सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

बाब क्रमांक : ४१/२

विषय- पुनर्रचित गाळयांची विवरणात्मक आणि संख्यात्मक माहिती दर्शविणारा तक्ता.

वरील विषयाची बाब टिपणी पृ.क्र. १०१ ते १०३ वर सादर करण्यात आली आहे. उपरोक्त विषयाबाबत माहिती देताना सचिव यांनी सांगितले की, तक्त्यामध्ये एकूण निवासी व अनिवासी गाळयांची संख्या, रिक्त गाळयांची संख्या, घुसखोरी झालेल्या गाळयांची संख्या तसेच बृहत्सूचीवरील भाडेकरुंसाठीअसलेल्या गाळयांची सधस्थितीबाबत विवरण दिलेले आहे. मा.सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, मागील बैठकीत निर्णय घेतल्याप्रमाणे सन्मा.सदस्यांना मंडळाच्या कारभाराबाबत माहिती असावी या दृष्टीकोनातून वरील माहिती सादर करण्यात आली आहे. अशी माहितीमुळे सन्मा.सदस्यांना मंडळाच्या कारभाराबाबतची साधस्थिती कळून येईल.

मा.सदस्य श्री प्रकाश भुवड यांनी असे निदर्शनास आणले की, घुसखोरी झालेल्या२७१ गाळयांच्या प्रकरणाचे विवरण दाखविण्यात आले आहे. त्यात निव्वळ घुसखोर ५२ दाखविले आहेत. याबाबत खुलासा करताना मा. सभापती यांनी अशी माहिती दिली की, निव्वळ घुसखोर म्हणजे ज्यांच्या विरोधात कोठलाही स्टे नाही, त्याची कोणत्याही अधिकाऱ्यासमोर सुनावणी नाही असे होत. मा.सदस्य श्री भुवड यांनी संक्रमण शिबीरातील गाळयांच्या बाबतही याप्रमाणेच सधस्थिती दर्शविणारा तक्ता देण्यात यावा. कारण संक्रमण शिबीरातील गाळयांतच जास्त घुसखोर आहेत असे मत मांडले. मा.सभापती यांनी या मताशी सहमती दर्शवून श्री मोरे, उपमुख्य अधिकारी [संगा.]

मूर्तता उमुअ/ (संशि)

यांना सूचना दिल्या की, संक्रमण शिबीरातील गाळयांबाबत सद्यस्थिती दर्शविणारा तक्ता यापुढे लेखी स्वरूपात देण्यात यावा. मा. सभापती यांनी सन्मा. सदस्यांना सांगितले की, संक्रमण शिबीरातील गाळयांची माहितीही उपलब्ध असून त्या माहितीच्या प्रती सर्व सदस्यांना देण्यात येतील. मा. सभापती यांनी पुढे माहिती दिली की, एकूण १७४९ घुसखोर संक्रमण शिबीरात असून त्यापैकी सक्षम प्राधिकारी व अपिल अधिकारी यांजकडे किती प्रकरणे आहेत याची माहिती देण्यात आलेली असून प्रकरणे निकाली काढण्यासाठी सक्षम प्राधिकारी व अपिल अधिकारी यांना विनंती करण्यात आली असून त्याप्रमाणे कामात प्रगतीही झाली आहे.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी तक्त्यात २७१ घुसखोर असल्याचे दाखविण्यात आले आहे. परंतु किती घुसखोर बाहेर काढले त्याचा आकडा मात्र दाखविण्यात आलेला नाही असे निदर्शनास आणले. मा. सदस्य श्री अरविंद रेळे यांनी असे मत व्यक्त केले की, याबाबत तुलनात्मक माहिती दिल्यास बरे होईल. म्हणजे मागील बैठकीच्या वेळी व चालू बैठकीच्या वेळी संख्या किती आहे हे दाखविण्यात यावे. त्यास मा. सभापती यांनी सहमती दर्शविली.

मा. सदस्य श्री दाजी मोडक यांनी स्वामी सदन आणि मणियार ह्या इमारतीतील व घुसखोरीबाबत व कोर्टाच्या प्रकरणाबाबत वर्तमानपत्रात छापून आले होते. त्याबाबत काही माहिती मिळू शकेल का? अशी विचारणा केली तर मा. उप सचिव श्री कोकणे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, हे जर घुसखोर असतील तर त्यांची प्रकरणे सक्षम प्राधिकारी आणि अपील अधिकारी यांच्याकडे दाखल का करुन घेतली जातात?

यावर मुख्य अधिकारी यांनी असा खुलासा केला की, हा मुद्दा अजूनही कायदेशीररित्या पूर्णपणे स्पष्ट झालेला नाही. म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ६६ अन्वये म्हाडाच्या कोणत्याही मालमत्तेवर जर कोणाचा अनधिकृत वापर असेल किंवा वास्तव्य असेल तर कायद्यातील प्रक्रिया अनुसरूनच त्या लोकांना बाहेर काढावे लागते. यापूर्वी ज्या लोकांनी निव्वळ घुसखोरी केली होती त्या लोकांना जेव्हा असेच बाहेर काढावयाचा प्रयत्न केला असता काही प्रकरणांमध्ये सिटी सिव्हील कोर्टाने सांगितले की, त्यांना बाहेर काढताना कायदेशीर प्रक्रिया अनुसरूनच त्यांना काढावे लागेल. त्यामुळे सक्षम प्राधिकारी यांजकडे प्रकरणे दाखल करावी लागली. परंतु नुकताच कोर्टाने असा निर्णय दिलेला आहे की, जे लोक निव्वळ घुसखोर आहेत

त्यांच्यासाठी कायदेशीर प्रक्रिया अनुसरावयाची गरज नाही. त्यांना कायद्याने कोणत्याही प्रकारचे संरक्षण प्राप्त होत नाही.

मा. उप सचिव श्री कोकणे यांनी विचारलेल्या मुद्याबाबत माहिती देताना मा. सभापती यांनी सांगितले की, मध्यंतरी उच्च न्यायालयाचे मा. न्यायाधीश कामत यांनी असा निर्णय दिला की, कोठल्याही माणसाला बाहेर काढताना कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन त्याला बाहेर काढले पाहिजे. यावर मंडळाने अपिल केल्यानंतर मा. न्यायाधीश धनुका यांनी सांगितले की, जे घुसखोर टाळे तोडून घुसलेले आहेत आणि ज्यांच्याकडे तेथील वास्तव्याबाबतचे कोठलेही पुरावे नाहीत त्यांना कोठल्याही प्रकारे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता काढता येते. मा. सभापती यांनी पुढे अनधिकृत इसम व घुसखोर इसम यांच्यातील फरक सांगताना माहिती दिली की, मंडळाची जागा मिळालेल्या भाडेकरुने जर त्या जागेत पोटभाडेकरु ठेवला तर तो इसम अनधिकृत म्हणून समजला जातो. अशा अनधिकृत वास्तव्यासाठी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी लागते. मा. धनुका यांच्या निर्णयाच्या प्रती सक्षम प्राधिकारी व अपिल अधिकारी यांजकडे दिल्यानंतर त्या निर्णयाच्या अनुषंगाने अनेक प्रकरणे निकाली काढण्यात येत आहे. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणून दिले की, खोट्या कागदपत्रांच्या आधारे लोक गाळे बळकावतात व खोट्या कागदपत्राच्या आधारे स्थगितीही मिळवितात. त्यामुळे बृहत्सूचीवरील भाडेकरु मात्र संक्रमण शिबीरात रहातात. याबाबत गुन्हे अन्वेषण विभागास विनंती करण्यात आली आहे आणि त्याची चौकशी चालू आहे.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, मंडळाचे जे अधिकारी अशा लोकांना मदत करतात त्यांच्यावर देखील काहीतरी कारवाई झाली पाहिजे. यावर मुख्य अधिकारी यांनी ~~अशावर~~ अशी माहिती दिली की, ज्या लोकांना घुसखोर म्हणून दाखवितो त्यापैकी ~~बऱ्याच~~ प्रकरणी घुसखोर लोक त्यांच्याकडे ७ - ८ वर्षांपासूनच्या भाडे पावत्या असल्याचे सांगतात.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत मांडले की, पूर्वी काही अधिकारी निलंबित करण्यात आलेले असल्यामुळे इतर कर्मचाऱ्यांमध्ये दहशत निर्माण झाली असेल अशी आपली समजूत होती. परंतु आजही अधिकारी, कर्मचारी दलालांना मदत करीत आहेत. यावर मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, त्यांच्या किंवा मुख्य अधिकारी यांच्या निदर्शनास अशा गोष्टी निदर्शनास येतात तेव्हा कोठलीही मुलाहिजा न ठेवता कारवाई केली जाते.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी अशी तक्रार केली की, सदस्यांनी जर एखादे प्रकरण नेले तर त्याप्रकरणी बराचसा कीस काढला जातो व जणुकाही सर्व काही कायद्याने चालले आहे असा आव आणला जातो. मग ज्या गोष्टी बेकायदेशीरपणे होतात त्याला जबाबदार कोण असतो. यांबाबत कोठलाही सदस्य मंडळाच्या या कारभाराबाबत समाधानी नाही असे आपणास दिसून येईल.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी अशी तक्रार केली की, गिरगांव येथील एका प्रकरणी गेले दोन महिने ते स्वतः व श्री भुवड प्रयत्नशील असूनही संबंधित भाडेकरूस कितीतरी फे-या माराव्या लागत आहेत. संबंधित अधिका-यास विचारल्यास नस्ती उपमुख्य अधिकारी किंवा सहमुख्य अधिकारी यांच्याकडे असल्याचे सांगितले जाते. परंतु घुसखोरांविरुध्द मात्र ठोस कारवाई केलेली दिसत नाही.तरी हे प्रकरण कधी निकालात निघणार?
यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, प्राधिकरणात सक्षम प्राधिकारी यांची तीन पदे शासनाने निर्माण केलेली आहे परंतु आता त्यापैकी फक्त एकच पद कार्यरत आहे.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी तक्रार केली की, गेले कित्येक महिन्यांपासून मंडळाचे सदस्य अधिका-यांच्या कार्यपध्दतीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करीत असूनही त्याकडे कोणी लक्ष देत नाही. यावर मा. सभापती यांनी अशा सूचना दिल्या की, याबाबत परिपत्रक काढून सदस्यांनी आणलेली कामे सर्व गोष्टींनी परिपूर्ण असल्यास ती १५ दिवसांत करण्यात यावीत कारण काही अधिकारी अनेक वेळा वरिष्ठ अधिका-यांनी आदेश देऊनही ते पाळत नाहीत.

यावर मुख्य अधिकारी यांनी असे मत प्रदर्शित केले की, पूर्वी जे अनधिकृत वाटप झालेले आहे ती बाब निश्चितपणे मंडळास शोभणारी नाही. अशा प्रकरणी सहभाग असणा-या उपमुख्य अधिकारी व मिळकत व्यवस्थापक यांना अटकही करण्यात आली आहे. मुख्य अधिकारी यांनी पुढे असे नमुद केले की, अनधिकृत लोकांना मंडळाच्याच अधिकारी/कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले असेल हा एक भाग झाला परंतु मा. सदस्य म्हणतात त्याप्रमाणे त्यांनी आणलेली कामे त्वरित का होत नाहीत हा दुसरा भाग आहे. वरील दोन्ही बाबींचा संबंध एकमेकाशी जोडण्यात येऊ नये. त्यानी पुढे असे निदर्शनास आणून दिले की, शासनाला अशी विनंती करण्यात आली होती की, २० टक्के कोटयातून गाळे देण्याचे धोरण अंमलात आणण्यात येऊ नये. कारण १५ - २० वर्षांपासून लोक संक्रमण शिबीरात रहात आहेत आणि प्रत्येकालक काहीना काही त्रास सोसावा लागतो. अशा लोकांपैकी कोणास

किती त्रास होतो हे पाहून मंडळ कोणाची निवड करणार?, दुसरे असे की, गाळे बदलून देण्याबाबतच्या विनंत्या मंडळाकडे येतात. हा विषय मंडळापुढे ठेऊन चर्चाही झाली आहे आणि अंतिम निर्णयासाठी बाब मंडळापुढे ~~ठेवावा~~ ठेवावयाची आहे. त्यांनी आपले मत देताना ठामपणे स्पष्ट केले की, गाळे जेष्ठतेनुसारच देण्यात यावेत, त्याच विभागात गाळे देण्यात यावेत, जादा क्षेत्रफळही कोणास दिले जाता कामा नये. ज्याला जेवढी जागा देय असेल तेवढीच जागा देण्यात यावी. मागील बैठकीत जादा क्षेत्रफळासाठी विभाग-निहाय दर ठरविले आहेत ~~त्याची काही आवश्यकता नाही.~~ बृहतसूचीचे काम विनाकारण दोन वर्षे बंद होते. महिन्याभरापूर्वीच ते पुन्हा सुरू करण्यात आले आहे. जेष्ठतेनुसार जर गाळ्यांचे वाटप केले तरच समाधान मिळू शकते याबाबत एकदा स्पष्ट निकष ठरवून दिले की, बृहतसूचीवरील लोकांना त्यांच्या मूळ विभागातच जागा देण्यात याव्यात, जर त्या विभागात जागा उपलब्ध नसेल तर शेजारच्या विभागात जागा देण्यात यावी. यामुळे कोठल्याही कनिष्ठ वा वरिष्ठ अधिकाऱ्यांस वितरण करण्यात कोणतीही अडचण येणार नाही व लोकांनाही कोणाकडे जाण्याची गरज भासणार नाही.

मुख्य अधिकारी यांचे वरील निवेदन स्पष्ट करताना मा. सभापती यांनी सन्मा. सदस्यांना विनंती केली की, मुख्य अधिकारी यांनी मांडलेले मत समजून घ्यावे. सन्मा. सदस्यांच्या व्यथा त्यांना मान्य आहेत.

मा. सदस्य श्री भुवड यांनी असे निदर्शनास आणले की, दोन महिन्यांपूर्वीच परिपत्रकाद्वारे मा. सदस्य ज्या मूळ कामासंबंधी तक्रारी करतात त्या तक्रारींचे एक महिन्यात परिमार्जन झाले पाहिजे अशा सूचना दिल्या होत्या. परंतु तीन चार महिन्यांपासूनच्या मंडळाच्या बैठकीत सदस्यांनी ज्या ज्या तक्रारी उपस्थित केलेल्या आहेत त्याबाबत साधे उत्तरही दिले जात नाही.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी विचारणा केलेल्या ३५-डी, ११, या इमारतीमध्ये एका रहिवाशास पाचव्या मजल्यावर गाळा वितरीत झालेला आहे. परंतु मंडळाच्या "ब" फॉर्ममध्ये चुक असल्यामुळे त्यांना विनाकारण त्रास दिला जात आहे. तसेच ७०-७५ वर्षांच्या गृहस्थास सतत तीन चार वेळा येऊनही, त्यांची कोणतीही चुक नसताना त्यांना त्रास दिला जात आहे. सदर गृहस्थ नेहमी १५ ते २० हजार रुपये भरण्यासाठी घेऊन येतात व पुन्हा घेऊन जातात.

मा. सदस्य श्री तिकोने यांनी अशी सूचना केली की, गाळा हस्तांतरणाची प्रकरणे निकालात काढण्यासाठी कालमर्यादा निश्चित करण्यात यावी. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, गाळे नियमितीकरणाची प्रकरणे बृहतसूचीच्या कामासाठी थांबवून ठेवले होते परंतु आता गाळे नियमितीकरणाचे काम सुरू करण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे मत मांडले की, संक्रमण शिबीरात जागा मिळणे हा भाडेकरुचा हक्क असतो. परंतु शिबीरातील भाडेवसुलीकार मात्र तेथील जागा तिऱ्हाईतास भाड्याने देतो व जेथे घुसखोरी होते तेथे लक्ष देत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आणि त्यामुळेच घुसखोरांची संख्या मोठी दिसते.

तन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत माहिती देताना मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, सहमुख्य अधिकारी हे रजेवर असल्यामुळे त्यांच्या कामाचा श्री तेरदाळकर, उपमुख्य अधिकारी यांच्यावर बराच बोजा पडला आहे. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणून दिले की, एका शेट्टी नांवाच्या इसमाने त्यांची भेट घेऊन २३,०००/- रुपयांची थकबाकी असल्यामुळे संक्रमण शिबीरातील गाळ्यातून मंडळाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना बाहेर काढण्यात आल्याचे सांगितले. तसेच २३,०००/- रुपयांपैकी रु. १०,०००/- भरावयास सदर भाडेकरु तयार असून त्यांची मुळ इमारत दुरुस्त होऊन सहा महिने झाले तरी अजूनही संक्रमण शिबीरातच ते रहात आहेत. परंतु त्याचे असे म्हणणे आहे की, त्यांना एप्रिलपर्यंत संक्रमण शिबीरात रहावयाचे असून मुळ इमारतीत जाणे सोयीस्कर नाही. त्यांच्या हया विनंतीवर त्यांनी त्यांना सांगितले की, ज्या तारखेपासून त्यांची मुळ इमारत दुरुस्त होऊन रहाण्यासाठी तयार आहे त्या तारखेपासून एप्रिल-९७ पर्यंत रहाण्याची परवानगी देण्यात येईल. परंतु एवढ्या कालावधीसाठी त्याने रु. ६००/- दरमहिना याप्रमाणे नुकसान भरपाई मंडळाकडे भरावी. तसेच रु. १०,०००/- आताच भरुन उर्वरित रु. १३,०००/- एप्रिल-१९९७ पर्यंत भरण्याची मुभा देण्यात येईल. वरील उदाहरण देण्याचे कारण स्पष्ट करताना मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदस्यांचे असे मत आहे की, मंडळाचे अधिकारी काही काम करीत नाहीत, ते संक्रमण शिबीरातील लोकांकडून हप्ते घेतात. परंतु वरील गृहस्थ हा संस्कृती असणारा असा गृहस्थ होता. व अशा लोकांना एकदम गाळ्याबाहेर सामानासकट काढणे बरोबर वाटत नाही. ~~याचा अर्थ असा होत नाही की~~ - मंडळाचे सर्वच लोक सक्षम नाहीत असे नव्हे. जर त्यांनी कारवाई केली तर मानवी समस्या पुढे येतात. आज मंडळाचे अधिकारी दबावाखाली काम करीत असतात असे सांगून मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, एक महिला गेली २५ वर्षे मंडळाच्या गाळ्यात घुसखोरी करुन रहात आहे. इतकी वर्षे ती कशी राहू शकते व आजपर्यंत तिला काढण्यात का आले नाही अशीही त्यांनी पृच्छा केली.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, गेल्या दीड वर्षात कोणाही सदस्याने बेकायदेशीर कृत्याला संरक्षण द्यावे असे सांगितलेले नाही. सदस्याचे एवढेच म्हणणे आहे की, मंडळामध्ये बेकायदेशीर कृत्ये चाललेली असताना फक्त सदस्य जेव्हा काही कायदेशीर प्रकरणे नेतात तेव्हा तरी विलंब न लावता परिपत्रकात सूचना दिल्याप्रमाणे त्यांना उत्तरे तरी देण्यात यावीत. जर एखादी संक्रमण शिबीरातील गाळा खराब होऊन तो रहाण्यास योग्य नसेल तर सदस्यांच्या विनंतीप्रमाणे बदलून देण्यास हरकत नाही. परंतु शेजारीच एखादी इमारत तयार झालेली आहे व त्या इमारतीमध्ये जागा मिळण्याची त्यांची मागणी असेल तर ते बरोबर नाही.

मा. सभापती यांनी सर्व अधिका-यांना उद्देशून सांगितले की, बैठकीत झालेल्या चर्चेवरून मा. सदस्यांच्या भावना अधिका-यांच्या लक्षात आल्या असतीलच. तसेच सन्मा. सदस्यांच्या मागणीबाबत मुख्य अधिकारी यांनी परिपत्रक काढून त्यांच्याकडील आढावा बैठकीत योग्य त्या सूचना देतीलच अशी अपेक्षा व्यक्त केली.

मा. सदस्य श्री सावंत यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, ओमकार या इमारतीत जसे ६ घुसखोर सापडले तसेच गेल्या ३-४ वर्षात ज्या इमारती पुनर्रचित झालेल्या आहेत त्या इमारतीतही तपासणी केली तर घुसखोर सापडण्याची शक्यता आहे. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, याबाबत एक परिपत्रक काढून सूचना देण्यात याव्यात की, भाडेवसुलीकाराने घुसखोरांची सर्वंकष माहिती द्यावी व अशी माहिती मिळण्यासाठी त्याने सुट्टीच्या दिवशी जाऊनही काम करावे व त्या बदल्यात त्यांना आर्थिक फायदा दिला जाईल.

मा. सदस्य श्री मोडक यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मा. सभापती यांनी माहिती दिली की, घुसखोरांना बाहेर काढून गाळ्यांना मंडळाने चाव्या लावल्या तरी दुस-या दिवशी मंडळाची टाळी तोडलेली आढळतात. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे परमानंदवाडी मधून घुसखोरांना बाहेर काढले तरी पुन्हा पुन्हा घुसखोरी होतच रहाते. याबाबत सी. आय. डी. चौकशी व काही जणांना झालेली अटक यामुळे आता परिस्थित सुधारत आहे.

मा. सदस्य श्री दगडू सकपाळ यांनी अशी सूचना केली की, बृहत्सूचीवरील लोकांना वितरीत करण्यात आलेल्या गाळ्यात भाडेकरू रहाण्यासारखी खरोखरच जर परिस्थिती नसेल तर त्या भाडेकरूस गाळा बदलून देण्यास हरकत नाही. यावर मुख्य अधिकारी यांनी ठामपणे सांगितले की, याबाबत निश्चित धोरण ठरविल्यानंतर त्याप्रमाणेच काम झाले पाहिजे. प्रकरण

२१

योग्य आहे की अयोग्य आहे हे ठरविण्याचा अधिकार कोणालाही रहात नाही.

मा. सभापती यांनी पुन्हा एकवार सर्व संबंधित अधिका-यांना सूचना दिल्या की, त्यांनी सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे नोंदवून घ्यावेत. सदस्यांना आलेल्या अनुभवामुळेच त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. श्री मोरे, उपमुख्य अधिकारी यांनी, पुढच्या बैठकीच्या वेळी दु. गा. विभागाप्रमाणेच लिखित स्वरूपात माहिती द्यावी, असे मा. सभापती यांनी आदेश दिले.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते पुनर्रचित गाळ्यांची विवरणात्मक व संख्यात्मक माहिती दर्शविणारा तक्ता मंजूर करण्यात आला.

---

बाब क्रमांक : ४१/३.

विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्तीच्या कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्तीच्या कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्यासाठी प्रस्ताव पृ. क्र. १०५ ते ३५७ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांवर चर्चा करताना मा. सदस्य श्री भूवड यांनी मुद्दा मांडला की, साधारणत: तिसरा टप्पा आल्यानंतर ती इमारत ८८ [३] घोषित करण्यात येते. यावर मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, ८८ [३] चा आधार आजच्या तारखेला ७५०/- आहे. मागील ३० वर्षापासून आपण फक्त इमारतींचा जेवढा धोकादायक भाग असतो तेवढाच दुरुस्त करतो. त्यामुळे दुसरा किंवा तिसरा टप्पा येणे साहजिक आहे. तथापि प्रमाणित मर्यादा रु. ७५०/- ऐवजी रु. १०००/- केली तर काही इमारती ज्या पूर्वी ८८ [३] खाली घोषित केल्या होत्या त्या इमारतींमध्ये सुध्दा तिसरा किंवा चौथा टप्पा दुरुस्तीसाठी घ्यावा लागेल.

मा. सभापती यांनी पृ. क्र. १३३ वर "पहिल्या टप्प्याची नस्ती उपलब्ध नाही" असे जे लिहिलेले आहे त्याकडे लक्ष वेधून विचारणा केली की, असे असेल तर दुस-या टप्प्याचे अंदाज कसे बनविण्यात आले ?

मा. सदस्य श्री उसपकर यांनी नू.कृ. १७९ वरील ११६-११८, नारायण धुरु स्ट्रीट या इमारतीत सर्व गाळे व्यावसायिक असल्याचे म्हटले आहे. परंतु एकूण रहिवाशी किती आहेत याची माहिती देण्यात आलेली नाही, असे निदर्शनास आणले. व त्या भाडेकरुंवर ना हरकत प्रमाणपत्रासाठी दबाव आणावा असे मत मांडले. यावर मा. सभापती यांनी निदर्शनास आणले की, दबाव आणुनही भाडेकरुंनी एन.ओ.सी. घेतली नाही व इमारत धोकादायक असेल तर प्रश्न निर्माण होतो. यावर उपमुख्य अभियंता (दक्षिण) यांनी सांगितले की, सदर इमारतीचे भाडेकरु एन.ओ.सी. द्यावयास तयार नाहीत.

नू.कृ. १५३ वरील ७८, कांबेकर स्ट्रीट बाबत मा. सभापती यांनी निदर्शनास आणून दिले की, सदर प्रस्तावामध्ये पूर्वी इमारतीचे क्षेत्रफळ जास्त दाखविण्यात आले आहे त्यामुळे मालकाच्या तक्रारी येतात की, दुरुस्तीच्या काळात भाडेकरु बेकायदेशीरपणे माळा वाढवितात. याबाबत आपल्या वास्तुशास्त्रज्ञांवर काय कारवाई केली आहे ? असे विचारले. उपमुख्य अभियंता श्री राव यांनी संबंधित वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडून खुलासा मागविण्यात आला असल्याचे सांगितले.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, सर्व अंदाजपत्रके प्रमाणित मर्यादेच्या रु. ७५०/- प्रती चौ.मी. जवळ आणून ठेवलेली आहेत. मा. सभापती यांनीही अंदाजपत्रके काठावर आणून ठेवण्याच्या प्रवृत्तीमुळे नाराजी व्यक्त केली.

यावर मुख्य अधिकारी यांनी संबंधित अधिकारी श्री राव व श्री पाटकर यांना विचारणा केली की, नॉन-स्ट्रक्चरल आयटेम अंदाजपत्रकात दाखवावयाचे नाहीत असा निर्णय झालेला असतानाही असे आयटेम का दाखविले ?

मा. सभापती यांनी असे मत मांडले की, प्रमाणित मर्यादा रु. ७५०/- वरुन रु. १०००/- जरी करण्याचे ठरले असले तरी त्याबाबतचे शासनाकडून परिपत्रक येईपर्यंत वेळ लागेल. म्हणून अधिकाऱ्यांनी असे समजू नये की, आता रु. १०००/- होणार असल्यामुळे पहिला व दुसरा टप्पा रु. ७५०/- वर नेऊन ठेऊ. अधिकाऱ्यांना खात्री असेल तर त्यांनी तसे ठामपणे मांडावे.

मुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अभियंता श्री राव यांना सूचना दिल्या की, यापुढे दुरुस्तीचे अंदाजपत्रक निवासी कार्यकारी अभियंता यांच्याकडून तपासल्याशिवाय मंडळापुढे ठेवण्यात येऊ नये. पूर्वीचीच तुरळीत अशी पद्धत चालू राहिली पाहिजे. त्या पद्धतीनुसार डिसेंबरमध्ये येणारी अंदाजपत्रके जानेवारीमध्ये येतील. परंतु कोणत्याही परिस्थितीत दुरुस्तीची

अंदाजपत्रके ही जनतेचा पैसा खर्च होणार असल्यामुळे निवासी कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयातून सविस्तर तपासणी झाल्यानंतरच मंडळापुढे आली पाहीजेत. आणि निवासी कार्यकारी अभियंता किंवा सक्षम अधिकारी यांनी कोणतीही शंका उपस्थित केल्यास त्या शंकेचे समाधान करण्यात आले पाहीजे.

मुख्य अधिकारी यांनी अखेर शेवटी कार्यकारी अभियंता, सी-३. सी-४ या विभागाचीं सर्व अंदाजपत्रके पुढील बैठकीत ठेवण्यात यावीत, व त्यापूर्वी कार्य. अभि. श्री पाटकर यांनी संबंधित इमारतींना भेटी देऊन पुन्हा तपासणी करावी अशा सूचना दिल्या.

प्रदीर्घ चर्चेनंतर मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या सूचना व हरकती लक्षात घेऊन दक्षिण परिमंडळातील सी-३, सी-४ विभागाची अंदाजपत्रके सोडून इतर विभागाच्या उपकरपात्र इमारतींच्या दुरूस्तीच्या कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले. तसेच सी-३, सी-४ विभागाच्या अंदाजपत्रकांची, संबंधित कार्यकारी अभियंता श्री पाटकर यांनी फेरतपासणी करुन ती उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी पाहील्यानंतर पुढील बैठकीत ठेवण्यात यावीत.

ठराव क्रमांक : ४१/३३३

दक्षिण परिमंडळातील सी-३-४ विभागाची अंदाजपत्रके सोडून इतर विभागाच्या परिशिष्ट "अ" मधील उपकरपात्र इमारतींच्या दुरूस्तीच्या कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी सर्वानुमते देण्यात आली. तसेच सी-३-४ विभागाची अंदाजपत्रके कार्य. अभि. श्री पाटकर यांनी पुन्हा तपासून ती उपमुख्य अभियंता [द.] यांनी पाहिल्यानंतर पुढील बैठकीत ठेवावीत. असे ठरले.

---

बाब क्रमांक : ४१/४.

विषय- उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या
दुरूस्तीच्या कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना
प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

---

उपरोक्त विषयाचे प्रस्ताव पृ. क्र. १३५९ ते ४६३ वर सादर करण्यात आले आहेत. वरील प्रस्तावांवर प्रदीर्घ चर्चा झाल्यानंतर मा. सभापती

यांनी उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरूस्तीच्या कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना सर्वानुमते प्रशासकिय मंजूरी मा. सदस्यांनी केलेल्या सूचना व हरकती लक्षात घेऊन देण्याचे ठरले.

ठराव कृमांक : ४१/३३४

उत्तर परिमंडळातील परिशिष्ट-ब मधील उपकरपात्र इमारतींच्या दुरूस्तीच्या कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

---

बाब कृमांक : ४१/५.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी घेण्यात येणारे प्रस्ताव.

[१] दि. ३ डिसें. १९९६ रोजी नेहरू सेंटर सभागृह येथे झालेल्या कार्यक्रमाच्या खर्चास मंजूरी.

........

विषयांकित प्रस्ताव. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सर्व सन्मा. सदस्यांना सादर करण्यात आला. सदर प्रस्तावाबाबत मा. सभापती यांनी सांगितले की, दि. ३ डिसें. १९९६ रोजी नेहरू सेंटर, वरळी येथे मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते बृहत्सूचीवरील गाळेधारकांना चाव्या प्रदान करण्याचा कार्यक्रम झाला. त्या कार्यक्रमासाठी सुमारे रू. ३४,७८८/- इतका खर्च आला. त्या खर्चास मान्यता देण्यासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन रूपये ३४,७८८/- एवढ्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

---

[२] विषय- इ.क्र. २९१, बी, आगबोट चाळ, दत्ताराम लाड मार्ग, ई. विभाग, मुंबई येथील इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेत सुधारित प्रशासकिय मान्यता देण्याबाबत.

........

उपरोक्त विषयाची बाब टिपणी मा. अध्यक्षांच्या परवानगी सर्व

सन्माननीय सदस्यांना सादर करण्यात आली. सदर प्रस्तावाची संक्षिप्त माहिती मा. सभापतींनी सर्व सदस्यांना दिली.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित पुनर्बांधणी योजनेच्या कामासाठी रू. ६०,८५,५५२/- एवढया रकमेस पुनर्सुधारित प्रशासकिय मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले.

---

[३] विषय- मुं. इ. दु. व. पु. मंडळाअंतर्गत संक्रमण शिबीराच्या दुरुस्ती व देखभाल कामांकरिता वेगळा विभाग कार्यरत करण्याबाबत.

........

विषयांकित प्रस्ताव उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने सर्व सन्मा. सदस्यांच्या समोर मांडला. सदर प्रस्तावात संक्रमण शिबीराच्या देखभाल व दुरुस्तीसाठी वेगळा विभाग कार्यरत करण्याचे प्रस्तावित केले होते. सदर प्रस्तावाची माहिती देताना मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, सर्व अभियंत्याचे असे मत आहे की, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या दुरुस्तीची व्याप्ती लक्षात घेता संक्रमण शिबीराच्या दुरुस्तीसाठीही वेगळा विभाग कार्यकारी अभियंता यांच्या नियंत्रणाखाली निर्माण करण्यात यावा. कारण दरवर्षी सुमारे पाच कोटी रुपयांची दुरुस्ती विविध संक्रमण शिबीरांमध्ये करावी लागते. त्यामुळे संक्रमण शिबीराच्या कामाचा फार मोठा बोजा उपमुख्य अभियंता [दक्षिण], [उत्तर], [पुनर्रचना] यांच्यावर पडतो. म्हणून हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे की, संक्रमण शिबीराच्या दुरुस्तीसाठी व देखभालीसाठी स्वतंत्र कार्यकारी अभियंता, उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांची नेमणूक करुन एक स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात यावा. त्यामुळे कामाची सुलभता वाढून कामही परिणामकारक होऊ शकेल तसेच भाडेकरूंच्या तक्रारींची योग्यप्रकारे दखल घेता येईल आणि म्हणून सदर प्रस्तावास मान्यता द्यावयास हरकत नाही असे मत मा. सभापती यांनी व्यक्त केले.

यावर मा. उप सचिव श्री कोकणे यांनी असे निदर्शनास आणले की, म्हाडाने पदे भरण्यासाठी हल्लीच वर्तमानपत्रात जाहीरात दिली होती परंतु शासनाकडून अशा भरतीस स्थगिती देण्यात आली आहे असे कळते. त्यामुळे नवीन विभाग जर कार्यरत करावयाचा असेल तर त्या विभागात नव्याने पद निर्मिती न करता दुसरा मार्ग काढून जर काही करता येण्यासारखे असेल तर त्याचा प्रथम मंडळाने विचार करावा. कारण नवीन पदे निर्मितीला

शासनाकडून मान्यता मिळण्याची शक्यता कमी आहे.

यावर मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, म्हाडामधील राजीव गांधी निवारा प्रकल्प हे कार्यालय मार्च-१९९७ पर्यंत चालू ठेवण्याचा निर्णय झालेला असून त्यानंतर ते कार्यालय बंद करण्यात येणार आहे. राजीव गांधी निवारा प्रकल्पामधील बहुतांशी कर्मचारीवृंद हा "कॉन्ट्रॅक्ट बेसिसवरील" आहे. त्यामुळे त्यांना कमी करावे लागणार आहे. त्यांच्यापैकी काही कर्मचारी मा. मंत्री महोदयांना व इतर मान्यवरांना भेटले व त्यांनी विनंती केली की, त्यांना नोकरीत प्राधान्याने सामावून घेण्यात यावे. मा. मंत्री महोदय यांनी सभागृहात जाहीर केले आहे की, एका बाजूला राजीव गांधी निवारा प्रकल्पामधील कर्मचाऱ्यांना कमी करण्यात येत आहे तर दुसऱ्या बाजूने पदे भरण्यासाठी जाहीरात देण्यात आली आहे. तरी मी ह्या जाहीरातीला स्थगिती देत आहे. मुख्य अधिकारी यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, आपण ज्या प्रवर्गासाठी जाहीरात दिली आहे त्या प्रवर्गाचा आणि राजीव गांधी निवारा प्रकल्पाच्या संबंधित कर्मचाऱ्यांचा फारसा काही ताळमेळ बसत नाही. त्यामुळे पदे भरण्यासाठी दिलेल्या जाहीरातीवरील स्थगिती उठविण्यासाठी शासनास विनंती करण्यात येणार आहे.

प्रदीर्घ चर्चेअंती दुरूस्ती मंडळाच्या अखत्यारितील संक्रमण शिबीराच्या दुरूस्तीसाठी व देखभालीसाठी नवीन विभाग कार्यरत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

-------

[४] विषय- गद विभागातील करी रोड येथील भूकर क्र. २८६ वरील १२२-१२४-१२६, खोजा चाळ येथील नियोजीत इमारतीच्या पुनर्बांधणी-अंतर्गत जोत्यावरील कामाच्या निविदा मंजूर करण्याबाबत.

........

उपरोक्त विषयाची बाब टिपणी मा. अध्यक्षांच्या परवानगीने सर्व सन्मा. सदस्यांना सादर करण्यात आली. सदर प्रस्तावाबाबत सविस्तर माहिती उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी सभागृहास दिली.

वरील प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणून दिले की, निम्नतम निविदाकार मे. आर. एस. गुप्ता यांची निविदा २५.५० टक्के अधिक ही जास्त असल्यामुळे ती कमी करण्याचे दृष्टीने

मुख्य अभियंता/प्राधिकरण यांच्या स्तरावर बैठक घेण्यात आली. सदर निविदाकाराने २५.५० टक्के अधिक वरून वाटाघाटीनंतर २१.५० टक्के अधिक पर्यंत वरील काम करण्याची तयारी दर्शविली व तसे लेखी कळविले आहे. तरी सदर प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित इमारतीच्या पुनर्बांधणी अंतर्गत जोत्यावरील कामाच्या निविदा रक्कमेवरील २१.५० टक्के अधिक [illegible] मंजूरी प्रदान करण्याचे ठरले.

---

[५] विषय- इ.क्र. २-४-६-८, १५वी गल्ली, ८ ते १६, शंकर पुप्पाला लेन, इ. विभाग, मुंबई ह्या इमारतीची पुनर्बांधणी योजना.

.......

उपरोक्त विषयाची बाब टिपणी मा. अध्यक्षांच्या परवानगीने सर्व सन्मा. सदस्यांना सादर करण्यात आली. सदर प्रस्तावाबाबत [illegible] देताना उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी सांगितले की, सदर [illegible] नियोजित गाळे स्वयंपूर्ण असून त्यामध्ये [illegible] ओटा व पोटमाळा अशा सोयी [illegible] ८०.९० लाख एवढ्या खर्चास प्रशासकिय मंजूरी मिळण्यासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

वरील प्रस्तावावर प्रदीर्घ चर्चा झाल्यानंतर सविस्तर चर्चेअंती सदर योजनेच्या ८०.९० लाख एवढ्या रक्कमेच्या खर्चास सर्वानुमते प्रशासकिय मंजूरी देण्याचे ठरले.

---

[६] विषय- दक्षिण परिमंडळातील अ, ब, डी-१ ह्या विभागातील जुन्या इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांना मंजूरी मिळण्याबाबतचे प्रस्ताव.

---

[१] इ.क्र. ५, सिनेमा लेन, दादी मॅन्शन. अ. विभाग. पहिला टप्पा सुधारित.

[२] इ.क्र. ८२, वीर नरीमन मार्ग, नगीन महल, पहिला टप्पा, अ. विभाग,

१२२

३५

[३] इ. क्र. १२३-डी, व्ही. पी. रोड, दुसरा टप्पा, डी. १ विभाग.

[४] इ. क्र. ७५-७९, निशानपाडा रोड, दुसरा टप्पा, ब. विभाग.

[५] इ. क्र. २१-२३, इब्राहीम मर्चंट मार्ग, दुसरा टप्पा, ब. विभाग.

........

वरील पाचही प्रस्तावांची थोडक्यात माहिती उपमुख्य अभियंता श्री राव यांनी सभागृहास दिली व सविस्तर चर्चेअंती वरील पाचही प्रस्तावांना सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

-------

[७] विषय- मुंबई बेटावर "अ" वर्गातील उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना. ह. प्र. प्रदान करण्याचे प्रस्ताव.

.........

मा. अध्यक्षांच्या परवानगीने मुंबई बेटावरील जुन्या "अ" वर्गातील उपकरपात्र इमारतीच्या पुनर्विकासासाठी नाहरकत प्रमाणपत्रा प्रदान करण्याचे खालील सहा प्रस्ताव सादर करण्यात आले.

[ ] भूकर पहाणी क्र. १६१३ व १/१६१३ [illegible] विभाग, टी. जे. मार्ग, फ/द विभाग शिवडी येथील हिरजी गोविंदजी चाळ, क्र. १, २, ३ व ४ ह्या "अ" वर्गातील उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

